# VJTI MUMBAI

वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था

Veermata Jijabai Technological Institute

(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)

H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019

Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ/वि.भ.ज./स्वयम् योजना/२०२६-२७/3330 /२०२६ दिनांक : 17 AUG 2026

परीपत्रक :

## वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या **धनगर** समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता स्वयंम् योजना शै. वर्ष २०२६-२७

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता संस्थेतील सर्व पदवी, पदविका, एम.सी.ए. आणि एम.टेक अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या **विमुक्त भटक्या जमाती प्रवर्गातील फक्त धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना** सदर परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच भाडे तत्वावर राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी **स्वयम् योजना** शासनाने सुरू केलेली आहे. सदर योजने अंतर्गत **प्रति वर्षी ६०,०००/-** इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट शासनामार्फत जमा केली जाईल.

योजनेचा लाभ घेण्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून सदर अर्ज व संबंधित कागदपत्र **मा. सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर, प्रशासकिय इमारत भाग १, चौथा मजला, आर. सी. चेंबुरकर मार्ग, चेंबूर पू, मुंबई ४०००४१ या पत्त्यावर** जमा करावे.

अर्ज भरण्याची लिंक www.vjti.ac.in या संकेतस्थळवर सुध्दा उपलब्ध आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**अर्ज भरण्याची लिंक : https://hmasnew.mahait.org/**

17/08/26

अध्यक्ष

शिष्यवृत्ती समिती

योजनेचे निकष :

१. सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० पेक्षा जास्त नसावे.
२. विद्यार्थ्याजवळ धनगर समाजाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
३. इयत्ता १२ वी मध्ये किमान ६०% गुण मिळालेले विद्यार्थी या योजनेस पात्र राहतील.
४. विद्यार्थ्यांनी MahaDBT पोर्टलवर अर्ज भरणे व तो अर्ज मंजूर असणे आवश्यक आहे.
५. विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल.
६. व्ही.जे.टी.आय. वसतीगृहातील विद्यार्थी या योजनेस पात्र राहतील.

प्रत : सर्व विभागप्रमुख, सुचना फलक, वसतीगृह,
ग्रंथालय, टिपीओ, संस्थेचे संकेतस्थळ